महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

news.thanejeevandeep@gmail.com

Rs.2/-

शनिवार ❖ ०४ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १५० ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

## कल्याण-डोंबिवलीत समाविष्ट

# २७ गावांचा पाणीप्रश्न मिटला

**३५७ कोटींच्या पाणी योजनेस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मान्यता**

*नव्याने समाविष्ट २७ गावांना होणार सुरळीत पाणी पुरवठा*

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द पूर्ण केल्याची भावना**






दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

मुंबई : कल्याण डोंबिवली शहरासाठी अमृत योजनेअंतर्गत ३५७ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मान्यता दिली आहे. यामुळे कल्याण डोंबिवली शहरासह नव्याने समाविष्ट २७ गावांना सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी मदत होणार आहे. याबद्दल उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. अमृत अभियानांतर्गत पाणीपुरवठा, पर्जन्य जलवाहिनी, नागरी परिवहन व हरित क्षेत्र विकास इ. पायाभूत सुविधांची निर्मिती शहरांमध्ये करण्यात येत आहे. त्यानुसार कल्याण डोंबिवली शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कल्याण डोंबिवली शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुधारित तांत्रिक बदल प्रस्तावाला राज्यस्तरीय तांत्रिक समिती तसेच राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली होती. त्यास अनुसरून या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

अमृत अभियानाची प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार (इश्रण) असणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सादर केलेल्या तांत्रिक बदलाच्या ३५७.१६ कोटी रुपयांच्या प्रकल्प किंमतीस मान्यता उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली आहे.

या योजनेचा लाभ कल्याण डोंबिवली शहरासह नव्याने समाविष्ट २७ गावांना होणार आहे. त्यामुळे सुरळीत पाणीपुरवठा होण्याबरोबरच १०५ दलघमी साठवण क्षमता देखील निर्माण होणार आहे. या योजनेला मान्यता देण्याचा शब्द उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी कल्याण-डोंबिवलीकरांना दिला होता. हा दिलेला शब्द पूर्ण केल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे.



# सुसाट प्रवासाची अखंड समृद्धी

## फेब्रुवारीत संपूर्ण समृद्धी महामार्ग प्रवाशांच्या सेवेत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**महायुती सरकारचा ड्रीम प्रोजेक्ट अखेर प्रत्यक्षात साकार झाला आहे. इगतपुरी ते मुंबईदरम्यानचा ७६ किलोमीटरचा शेवटचा टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. आता संपूर्ण समृद्धी महामार्ग प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. या महामार्गाच्या पूर्णत्वामुळे मुंबई ते नागपूर हे अंतर आता १६ तासांऐवजी फक्त ८ तासांत पार करता येणार आहे. फेब्रुवारी महिन्यात या महामार्गाचे उद्घाटन होण्याची शक्यता आहे.**

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा ७०१ किलोमीटर लांबाची आहे. सध्या नागपूरपासून इगतपुरीपर्यंत ६२५ किलोमीटरच्या महामार्गावरुन वाहतूक सुरु आहे. इगतपुरी ते मुंबईदरम्यानचा ७६ किलोमीटरचा शेवटच्या टप्प्याचे काम सुरु होते. आता या टप्प्याचे काम देखील पूर्ण झाले आहे.

समृद्धी महामार्ग प्रकल्प पंतप्रधान मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट मानला जातो. समृद्धी महामार्ग हा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी गेम चेंजर ठरणार आहे. सर्वोत्कृष्ट अभियंता पुरस्कार विजेते सिव्हिल इंजिनियर डॉ. अनिलकुमार बळीराम गायकवाड हे या ड्रीम प्रोजेक्टचे शिल्पकार आहेत. डॉ. गायकवाड यांनी श्ऐंअ्ण चे मुख्य अभियंता म्हणून समृद्धी महामार्गाच्या उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**समृद्धी महामार्गाची वैशिष्ट्ये**

समृद्धी महामार्गा हा ६ लेनचा, १२० मीटर रुंदीचा आणि ७०१ किलोमीटर लांब महामार्ग देशातील सर्वात अत्याधुनिक एक्सप्रेसवे आहे. या महामार्गावरुन ताशी १५० किमी प्रतितास वेगाने वाहने धावतात. समृद्धी महामार्गावर ६५ फ्लायओव्हर, २४ इंटरचेंज, ६ बोगदे आणि अनेक वाहन तसेच पादचारी अंडरपास आहेत. इगतपुरी ते मुंबईदरम्यान कसारा जवळ ८ किलोमीटर लांब जुळया बोगद्यांपैकी एक बनवण्यात आला आहे, जो अत्याधुनिक जर्मन तंत्रज्ञानावर आधारित फुल वॉटर मिस्ट सिस्टमने सुसज्ज आहे. इतकचं नव्हे तर वन्यजीवांच्या सुरक्षिततेसाठी ८० हून अधिक संरचना उभारण्यात आल्या आहेत. महामार्गाजवळ १८ नवीन स्मार्ट टाऊन्स उभारले जाणार आहेत, जिथे स्थानिक वैशिष्ट्यांवर आधारित उद्योगांची स्थापना केली जाणार आहे. ६७,००० कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या या महामार्गामुळे राज्यातील १० जिल्ह्यांना थेट आणि १४ जिल्ह्यांना अप्रत्यक्ष कनेक्टिव्हिटी मिळाली आहे. यामुळे प्रचंड सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे.



# तो पुन्हा येणार ?

## चीनमध्ये कोरोना सदृश्य महामारी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

साधारण पाच वर्षापूर्वी संपूर्ण जगभरात एकाच आजाराची दहशत होती. हा आजार, किंबहुना ही माहमारी होती कोरोना व्हायरसची. चीनमधून डोकं वर काढलेल्या कोरोना विषाणूच्या संसर्गानं पाहता पाहता सारं जग व्यापलं आणि सगळीकडेच Lockdown पर्यंतची परिस्थिती ओढावली

आता कुठे या महामारीच्या संकटातून जग सावरत नाही आणि नागरिकांचं आयुष्य पूर्वपदावर येत नाही तोच आता चीनमध्ये पुन्हा एका महामारीनं डोकं वर काढलं असून, आता हे संकट जगासाठीही धोक्याची घंटा असल्याचं म्हटलं जात आहे. चीनमध्ये सध्या रुग्णालयांमध्ये लांबच लांब रांगा पाहायला मिळत असून, इथं नागरिकांनी पुन्हा एकदा सक्तीनं मास्कचा वापर सुरु केला आहे. चीनमध्ये सध्या सुरु असणाऱ्या घडामोडी संशयास्पद असल्याचं म्हणत जागतिक स्तरावरील वृत्तसंस्थांमध्ये हे राष्ट्र पुन्हा एकदा जगाला संकटात टाकू शकते याविषयीची शंका व्यक्त केली जात आहे. कोरोना काळात जी परिस्थिती पाहायला मिळाली होती असंच काहीसं चित्र सध्या चीनमध्ये पुन्हा पाहायला मिळत आहे. सध्या इथं रुग्णालयांमध्ये लांबच लांब रांगा असून, हे सर्वकाही HMPV नावाच्या एका विषाणूजन्य आजारामुळे घडत असल्याचं सांगण्यात येत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार सध्या चीनमध्ये चार विषाणूंचा संसर्ग फोफावला असून, इथं एचएमपीव्ही म्हणजेच माइकोप्लाज्मा निमोनिया अतिशय झपाट्यानं पसरत असल्यानं आरोग्य यंत्रणाही चिंतेत आल्या आहेत. या विषाणूची एकंदर रचना कोरोनाच्या विषाणूप्रमाणंच असून तो हवेमार्फत संक्रमित होत असल्याचं सांगण्यात येत आहे.

चीनमध्ये पुन्हा एकदा रुग्णालयांपासून स्मशानांपर्यंत सतर्कता बाळगली जात असतानाच कोविडप्रमाणंच यावेळीसुद्धा जागतिक आरोग्य संघटनेनं मात्र यावर कोणतंही वक्तव्य केलेलं नाही. किंबहुना चीन कोरोनाप्रमाणंच आणखी एक महामारी जगाला देणार का? हाच चिंताजनक प्रश्न आता अनेक स्तरांतून उपस्थित केला जात आहे.

# बच्चू कडू यांचा राजीनामा !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



प्रहारचे नेते आणि राज्याचे माजी मंत्री बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियानाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. या पदावर राहून मला दिव्यांगांना न्याय देईल असं वाटत नाही, दिव्यांगांना न्याय देण्यासाठी आता आंदोलन करावे लागणार असल्याचं सांगत बच्चू कडू यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहीत कडू यांनी राजीनामा सोपवला आहे. बच्चू कडू यांनी म्हटलं आहे की, 'भारतातले पहिले दिव्यांग मंत्रालय महाराष्ट्रात निर्माण केल्याबद्दल एकनाथ शिंदे यांचे मनापासून आभार. परंतु अद्यापपर्यंत दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासासाठी मंत्रालयाचे काम सुरु झाले नाही. पदावर राहून हे काम होणार, अशी शक्यता मला मावळता दिसत आहे. दिव्यांगासोबत बेईमानी मला शक्य नाही. त्यामुळे मी माझा दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान, अध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे. तो मंजूर करुन सहकार्य करावे, तसेच मला असलेली सुरक्षाही काढून टाकावी व कुठलीही सुरक्षा देण्यात येऊ नये,' अशी मागणी बच्चू कडू यांनी केली आहे.

**बच्चू कडू यांच्या पत्रात कोणते मुद्दे?**

दिव्यांगांबाबत राज्य सरकारकडून अपेक्षित पावलं टाकण्यात येत नसल्याचं सांगत बच्चू कडू यांनी काही मुद्दे उपस्थित केले आहेत. 'दिव्यांग मंत्रालय निर्माण झाले परंतु, १. इतर राज्यांपेक्षा दिव्यांगांना महाराष्ट्रामध्ये मिळणारे मानधन सर्वात कमी आहे. २. मिळणारे मानधन वेळेवर कधीच मिळत नाही. ३. स्थानिक स्वराज्य संस्था ५ टक्के निधी खर्च करत नाही. ४. अजूनही स्वतंत्र मंत्री नाही आणि सचिव पण नाही. ५. जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र कार्यालय नाही आणि पद भरती नाही. ६. इतर अनेक गोष्टी ज्या झाल्या नाहीत आणि या पदावर राहून ते होणार अशी शक्यता मावळली आहे. म्हणून दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासासाठी मला आंदोलने करावी लागणार असून पदावर राहून आंदोलन करणे शक्य नाही, दिव्यांगासोबत बेईमानी कदापि शक्य नाही. म्हणून मी माझा राजीनामा देत आहे. तो मंजूर करुन सहकार्य करावे, तसेच मला असलेली सुरक्षा काढून टाकावी आणि कुठलीही सुरक्षा ठेवण्यात येऊ नये,' अशी भूमिका बच्चू कडू यांनी मांडली आहे.

# बदलापुरात भव्य राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** अंबरनाथ तालुका अध्यात्मिक समिती आणि आमदार किसन कथोरे यांच्या संयुक्त विद्यमाने बदलापुरात रविवार ५ जानेवारी ते १२ जानेवारी या काळात राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बदलापूर पूर्व येथील गांधी चौकातील मराठी शाळेच्या पटांगणात दररोज संध्याकाळी ७ ते ९ या काळात या कीर्तन महोत्सवाच्या आयोजन करण्यात आले आहे. यात महाराष्ट्रातील प्रसिद्ध आणि राष्ट्रीय कीर्तनकार यांचे सुश्राव्य कीर्तनाचा आस्वाद बदलापूरकरांना घेता येणार आहे. बुलढाण्याचे पुरुषोत्तम महाराज पाटील, विशाल महाराज खोले, इंद्रजीत रसाळ, पांडुरंग घुले, पोपट पाटील, विक्रांत पोंडेकर, ज्ञानेश्वर शिंदे तसेच विनोदाचार्य प्रकाश बोधाले यांच्या काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता होणार आहे. गेल्या २२ वर्षांपासून सुरू असलेल्या या राष्ट्रीय कीर्तन महोत्सवाला बदलापूर आणि पंचक्रोशीतील वारकरी संप्रदायातील मंडळी मोठ्या उत्साहाने सहभागी होत असतात. तरुणांनी ही या कीर्तन महोत्सवाचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक आमदार किसन कथोरे यांनी केले आहे. किर्तन महोत्सवाची सांगता रविवार १२ जानेवारी रोजी शहरातून दिंडी च्या माध्यमातून होणार असून बदलापूर पश्चिम येथील गणेश चौक ते गांधी चौक येथील किर्तन सोहळयापर्यंत सकाळी सात वाजता ही दिंडी सुरू होणार असल्याची माहिती बदलापूर पश्चिम विभागाचे भाजपचे शहराध्यक्ष शरद तेली यांनी दिली. तर काल्याच्या कीर्तनानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून जास्तीत जास्त भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा आणि दररोज कीर्तनालाही मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भाजपचे बदलापूर पूर्व शहर अध्यक्ष संजय भोईर यांनी केले आहे.



# ठाणे जिल्ह्यात 'स्वच्छ माझे अंगण' अभियान

**वैयक्तिक शौचालयाचा वापर, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणाऱ्या कुटूंबांचा होणार गौरव**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

दि. ०३(जिल्हा परिषद, ठाणे)- कुटूंबस्तरावर वैयक्तिक शौचालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन स्वच्छतेची सवय अंगीकृत करणे, नियमितपणे वापर करणाऱ्या कुटूंबांना प्रोत्साहन देणे, त्यांचे अनुकरण करण्याकरीता इतर ग्रामस्थांना, कुटूंबधारकांना त्यांच्याप्रमाणे वैयक्तिक स्वच्छता सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून घेण्यासाठी ठाणे जिल्ह्यामध्ये दि. १ ते २० जानेवारी, २०२५ या कालावधीत स्वच्छ माझे अंगण अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.

स्वच्छ भारत मिशन (प्रा.) टप्पा २ अंतर्गत कुटूंबस्तरावर वैयक्तिक शौचालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत जिल्ह्यात ज्या कुटुंबानी वैयक्तिक शौचालय वापर, सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोषखड्डा, परसबाग, पाझर खडा, घनकचरा व्यवस्थापनाकरीता कंपोस्ट खतखड्डा अथवा घरगुती खतखड्डा तसेच कुटुंबस्तरावर कचराकुंड्या या बाबतची उपलब्धता करून घेतले, अशा कुटुंबांना प्रोत्साहन देत इतरही कुटुंबांनी त्यांचे अनुकरण करण्याच्या उद्देशाने हे अभियान राबवण्यात येत आहे. देखभाल दुरुस्ती करण्यासाठी कुटुंबाने पुढाकार घेणे, घरगुती स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण करणे, कुटुंबस्तरावर सुका, ओला कचराकुंड्यांमध्ये वर्गीकरण करणे, वर्गीकरण केलेल्या घरगुती कचऱ्याचे कंपोस्ट खतखड्डा किंवा घराच्या परिसरात व्यवस्थापण करणे, परसबाग, पाझरखड्डा, शोषखड्याद्वारे घरगुतीस्तरावर सांडपाणी व्यवस्थापनावर अभियानात विशेष भर देण्यात येत आहे. सर्व प्रथम अभियानाची माहिती दवंडी देऊन, गावातील सूचना फलकांवर लावून गावात ग्रामस्थांना माहिती देण्यात येत आहे. दि. २१ ते २४ या कालावधीत पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फतीने वैयक्तिक स्तरावर शौचालयाचा वापर, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणाऱ्या कुटूंबांची पडताळणी करून कुटूंबांची निवड करण्यात येणार आहे. ज्या कुटूंबाची निवड करण्यात येणार, त्यांच्याकडे किंवा परिसरात घरगुती खतखड्डा, परसबाग, वैयक्तिक शोषखड्डा, पाझर खड्डा, वैयक्तिक शौचालय, घरगुती कचराकुंड्या आदी सुविधा असणे आवश्यक आहे. उत्कृष्ट व्यवस्थापन करणाऱ्या कुटंबांना दि. २६ जानेवारी, २०२५ रोजी ग्रामसभेमध्ये सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचे संयुक्त स्वाक्षरीने प्रशस्तीपत्र, श्रीफळ, पुष्प देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे. 'स्वच्छ माझे अंगण' अभियान अंमलबजावणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.) प्रमोद काळे यांचे नेतृत्वात करण्यात येत आहे. सर्व पंचायत समितीस्तरावर गटविकास अधिकारी यांना पत्रव्यवहार करण्यात आला असून गावस्तरावर स्वच्छ माझे अंगण अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.



## वाचकांचे पत्र

प्रति,
आपल्या पेपर मध्ये सामान्य जनतेला उपयोगी पडतील अशा बातम्यांचा समावेश असतो.त्याचप्रमाणे बातम्यांची मांडणी देखील छान असते. मा. मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या २ घोषणांची बातमी विस्तृत रित्या आपल्या पेपरमध्ये वाचावयास मिळाली.
या घोषणा शेतकऱ्यांसाठी आणि सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नक्कीच उपयुक्त ठरतील.त्याचप्रमाणे लेखकांचे लेख स्वरूपात असलेले दिनविशेष सुद्धा छान असतात.अशाच महत्त्वाच्या बातम्या व छान छान लेख वाचण्यासाठी मी आपला पेपर नियमित वाचते आणि यापुढे वाचेन.
धन्यवाद

आपली वाचक
अनघा जोशी

## गीतासार



कालच्या अंकात उल्लेख केल्याप्रमाणे आज आपण अर्थासहित गीतेसाठी सुरुवात करत आहोत.

**अथ प्रथमोऽध्यायः**

अर्थ

पहिला अध्याय सुरु होतो.

***धृतराष्ट्र उवाच। धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः। मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत सञ्जय ।१-१।***

अर्थ

धृतराष्ट्र म्हणाले, हे संजया, धर्मभूमी असलेल्या कुरुक्षेत्रात युद्धाच्या इच्छेने एकत्र जमलेल्या माझ्या आणि पांडूच्या मुलांनीही काय केले? ।१-१।

***सञ्जय उवाच। दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा। आचार्यमुपसङ्गम्य राजा वचनमब्रवीत ।१-२ ।***

**अर्थ**

संजय म्हणाले, त्यावेळी व्यूहरचना केलेले पांडवांचे सैन्य पाहून राजा दुर्योधन द्रोणाचर्यांजवळ जाऊन असे म्हणाला ।१-२ ।


***पश्यैतां पाण्डुपुत्राणामाचार्य महतीं चमूम । व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ।१-३ ।***

**अर्थ**

अहो आचार्य, तुमच्या बुद्धिमान शिष्याने-द्रुपदपुत्र धृष्टद्युम्नाने-व्यूहरचना करून उभी केलेली ही पांडुपुत्रांची प्रचंड सेना पाहा. ।१-३ ।

### आरोग्य टिप्स

## आलू बुखार खाण्याचे फायदे



आलू बुखारमध्ये भरपूर प्रमाणात पोटॅशियम आणि व्हिटॅमिन सी ज्यामुळे तुमच्या हृदयाचे आरोग्य निरोगी राहाते आणि हृदय विकाराचा धोका टळण्यास मदत होते. त्यासोबतच आलू बुखारामुळे भरपूर प्रमाणात पोषक तत्वं असतात ज्यामुळे तुमच्या शरीरातील रक्तदाब नियंत्रित राहाण्यास मदत होते. आलू बुखाराचे नियमित सेवन केल्यमुळे तुम्हाला कोणत्याही प्रकारचा कर्करोगाचा त्रास होत नाही. आलू बुखारामध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते ज्यामुळे तुमच्या शरीरातील वजन नियंत्रित राहाण्यास मदत होईल. आलू बुखारामध्ये भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडेंट्स असतात ज्यामुळे तुमच्या त्वचेचं आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते.

# नातं



मित्र भेटला परवा...
खूप जुना...
बऱ्याच वर्षांपूर्वी भांडण झालं होतं आमचं... नेमकं कारणही आठवत नव्हतं मला, इतक्या वर्षांनंतर...
म्हणाला, 'मुद्दामहून भेटायला आलोय तुला... हा योगायोग नाही... क्षुल्लक कारणांमुळे नाती तुटलेल्या सगळ्यांना भेटायचं ठरवलंय.'
सुरुवात माझ्यापासूनच होती. कारण, सगळ्यात जास्त किरकोळ कारणावरुन... सर्वात अधिक घट्ट नातं तुटलेल्यांत मी अग्रस्थानी होतो...
अचानकच समोर आल्याने मला माझा अहंकार काही पुरता बाजुला सारता आला नाही... तेव्हढा वेळच नाही मिळाला.
विचारलं मी त्याला अचानक ऊपरती होण्यामागचं कारण... चेहऱ्यावर शक्य तेव्हढा 'आलासच ना अखेरीस' हा माज ठेऊन.
तो मला म्हणाला,
'दोन महिन्यांपूर्वी मला माझी चूक कळली... कॉलेजमध्ये थर्ड ईयरला असताना तू एकदा रफू केलेली पॅन्ट घालून आला होतास... ते कोणाला कळू नये म्हणून केलेल्या अवाजवी प्रयत्नात, नेमकं ते माझ्याच लक्षात आलं... आणि मग मी त्याचा बाजार मांडायला अजिबात वेळ दवडला नव्हता...
वर्गात सगळ्यांना सांगून, सगळे तुझ्याकडे अगदी बघून बघून हसतील याचीही सोय केली...
त्यानंतर तू मला तोडलस ते कायमचंच... मी किमान वीस वेळा मागितलेली तुझी माफी दुर्लक्षुन...
तू त्यावेळी मला म्हणाला होतास, 'देव न करो आणि कधी तुझ्यावर अशी वेळ येवो'...
ती वेळ माझ्यावर आली... दोन महिन्यांपुर्वी...
नाही शिवू शकलो मी ते भोक...
नाही करु शकलो रफू...
नाही बुजवता आलं मला, माझ्याकडचा होता नव्हता तो पैसा ओतून ते एक छीद्र...
माझ्या मुलाच्या हृदयात पडलेलं...!
गेला तो तडफडत मला सोडून, कदाचित मला दुषणं देत...
'कसला बाप तू?' अशी खिल्ली ऊडवत बहुदा मनातल्या मनात...
म्हणूनच आलोय मी तुझ्याकडे...
आता निदान आपल्या फाटलेल्या नात्याला तरी ठिगळ लावता येईल की नाही बघायला...
यावेळी तू आपलं नातं 'रफू' केलेलं पहायला...
त्यावेळी जेव्हढा हसलो मनापासून खदखदून, तेव्हढंच ह्यावेळी मनापासून हमसून रडायला'.
सुन्न होऊन ऐकत होतो मी...
संवेदना जागी असली की वेदनेला मोठ्ठ अंगण मिळतं बागडायला...
'देव करो नी तुझ्यावर ही वेळ न येवो', चा असा टोकाचा अर्थ मला अजिबातच अभिप्रेत नव्हता.
घट्ट मिठी मारली आम्ही एकमेकांना... नी भिजवायला लागलो एकमेकांचे विरुद्ध खांदे.
'तो' त्याने नकळत केलेल्या 'पापातून' अन् 'मी' नकळत दिलेल्या 'शापातून' ऊतराई होऊ बघत होतो...
मूकपणे एकमेकांची माफी मागू पाहत होतो... दोघं मिळून एक नातं, नव्याने 'रफू' करू पाहत होतो!
तात्पर्यः सर्वांना एकच नम्र विनंती, मनुष्य जन्म एकदाच मिळतो, मिळालेले हे जीवन जास्तीत जास्त सार्थकी लावणेचा सदैव प्रयत्न झाला पाहीजेत, त्यासाठी सर्व नातेसंबदांना जपा, कुणाचाही अपमान करू नका, कुणालाही क्षुल्लक क्षुद्र लेखू नका. आपले मित्र नातेवाईक, शेजारी, सहकारी आपले नोकर चाकर हे आर्थिक व सामाजिक परिस्थींतीने कमी असले तरी त्यांच्यात कधीच उणे-दुणे काढू नका, त्यांच्यातील कोणत्याच वर्मावर कधीही बोट ठेवून त्यांचा अपमान करू नका. जगात परिपूर्ण कुणीही नाही, आपल्या आचरणणांने कुणी दुखावेल व दुरावेल असे शब्द कधीही उच्चारु नका. आपल्या वाणीवर व वर्तनावर सदैव नियंत्रण ठेवा, व कधी अनावधनाने कुणी दुखावलेच तर वेळीच 'रफू' करायला विसरू नका......

**लेखक**
**अनामिक**

## आजचे राशिभविष्य

**मेष**
तुमचे आरोग्य चांगले राहील. आज तुम्ही तुमच्या प्रियजनांसोबत चांगला वेळ घालवाल.

**वृषभ**
एक पद्धतशीर दैनंदिन दिनचर्या आणि खाण्याच्या सवयी तुमचे आरोग्य चांगले ठेवतील.

**मिथुन**
तुमचा जोडीदार तुमच्या बोलण्याने प्रभावित होईल आणि तुमच्या कामात तुम्हाला मदत करेल.

**कर्क**
मीडिया आणि संवादाशी संबंधित व्यवसायात यश मिळण्याची शक्यता आहे. व्यापारात प्रगती होईल.

**सिंह**
जवळच्या नातेवाईकांच्या आगमनामुळे घरात उत्सवाचे वातावरण राहील. विचारांची देवाणघेवाण होईल.

**कन्या**
परदेशात जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना काही चांगली बातमी मिळू शकते.

**तूळ**
तुमच्या बोलण्याने कोणाचे मन दुखावले जाणार नाही याची काळजी घ्याल.प्रकृतीकडे लक्ष द्या.

**वृश्चिक**
तुम्हाला अधिकृत ट्रिप देखील करावी लागू शकते. पदोन्नतीचीही शक्यता आहे. संयम आणि शांत राहा.

**धनु**
एखाद्या राजकीय आणि अनुभवी व्यक्तीचा सल्ला आणि मदत तुमच्या व्यवसायाला नवी दिशा देईल.

**मकर**
काही काळापासून सुरू असलेल्या समस्यांपासून दिलासा मिळेल. कुठूनतरी योग्य सल्ला मिळेल.

**कुंभ**
तुमची दैनंदिन दिनचर्या नियोजित पद्धतीने व्यवस्थित करा, यामुळे तुमचे कार्य यशस्वी होईल.

**मीन**
जवळच्या नातेवाइकांशी सुरू असलेले वाद मिटल्यामुळे नात्यात गोडवा येईल.

## टी बॅग सौंदर्यासाठी फायदेशीर



**१. डोळ्यांसाठी टी बॅग फायदेशीर**

फुगलेले डोळे दूर करण्यासाठी तुम्ही टी बॅग वापरू शकता. आपल्याला फक्त वापरलेल्या टी बॅग थंड करण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवाव्या लागतील. त्यानंतर १०-१५ मिनिटे डोळ्यांवर ठेवा. यामुळे सूज कमी होते आणि थकलेल्या डोळ्यांना आराम मिळण्यास मदत होते.


**२. निस्तेज त्वचेसाठी टी बॅग वापरा**


निस्तेज त्वचेला ताजेतवाने करण्यासाठी टी बॅग देखील खूप फायदेशीर आहेत. हलक्या मसाजसाठी वापरता येतो.यामुळे त्वचेला नैसर्गिक चमक मिळते. तसेच, निस्तेज त्वचेने खूप ताजेतवाने वाटेल.

**३. सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी टी बॅग वापरा**

अनेकदा सूर्यप्रकाशामुळे काही लोकांना सनबर्नची समस्या उद्भवते. अशावेळी त्याला दिलासा देण्यासाठी ग्रीन टी बॅगचा वापर केला जाणार आहे. आपल्याला फक्त ग्रीन टी पिशव्या थंड कराव्या लागतील आणि सनबर्न एरियावर लावाव्या लागतील. यामुळे त्वचा थंड होते आणि चिडचिड कमी होते.

## पर्यटन





# श्रीक्षेत्र गिरनारपर्वत
## गुरुदेव दत्तप्रभूंचे निवासस्थान

भगवान दत्तात्रेयांनी प्रत्यक्ष निवास करण्याचे ठिकाण असे हे गिरनार पर्वत. भगवान दत्तात्रयांनी आपल्या चिरंतन वास्तव्याने सुशोभित केलेले आणि बारा हजार वर्षे तपश्चर्या करून सिद्ध केलेले असे हे गिरनार पर्वत आहे. अशी दत्तभक्तांची अनन्य श्रध्दा आहे. भौगोलिक दृष्टया हे परिसर लहान मोठ्या पर्वतांच्या श्रेणींनी वेढलेला आहे. या पर्वतास रेवताचल पर्वत, रैवत,रेवताचल, कुमुद, उज्जययंत असे म्हणून ओळखतात. रेवताचल, कुमुद आणि उज्जययंत ही नावे ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्याशी निगडित आहे. श्री गिरनार हे भगवान दत्तात्रयांचे अक्षय निवासस्थान म्हणून प्रख्यात आहे. गिरनार(जुनागड)(सौराष्ट्र गुजरात) हे क्षेत्र गुजरात राज्यात सौराष्ट्र प्रांतात जुनागड जिल्ह्यात येते.जुनागड या शहरापासून हे स्थान ५ किमी अंतरावर आहे.गिरनार पर्वत जाण्यासाठी १०,००० पायऱ्या चढून जावे लागते. दत्त भक्त येथे दत्तात्रयांच्या पादुकांचे दर्शन घेण्यासाठी जातात.येथे आल्यावर नेहमी गुरुदेव दत्तांचा निवास असल्याचा प्रत्यय दत्त भक्तांना येतो. गिरनार पर्वत हे निसर्गरम्य, वन्यप्राणी, विविध औषधी वनस्पतीने समृद्ध असा परिसर आहे.

ही भूमी योगी सिद्ध महात्मांनी समृद्ध आणि संपन्न आहे. गिरनार पर्वत असे पवित्र सिद्ध स्थान आहे,येथे अनेक संतांना प्रभू दत्तगुरूंनी साक्षात दर्शन दिले आहे. बाबा किनाराम अघोरी, श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज, नारायण महाराज, रघुनाथ निरंजन, या संतांना प्रत्यक्ष दत्तगुरूंनी साक्षात दर्शन दिले आहे. गिरनार पर्वताच्या पायथ्याला भवनात मंदिर, भगवान महादेव मंदिर, मृगी कुंड, लंबे हनुमान मंदिर अशी प्रेक्षणीय स्थळे आहेत. येथे दरवर्षी शिवरात्रीच्या मेळाव्यात या कुंडाजवळ १० ते १२ लाख लोकांचा जमावडा असतो. या मृगी कुंडाच्या संदर्भात एक आख्यायिका आहे की, स्वयं देवाधिदेव महादेव या कुंडात स्नानासाठी येतात. या परिसरात जुना आखाडा, निरंजन आखाडा, आव्हान आखाडा, अग्नी आखाडा, असे अनेक आखाडे आहे. इथे श्री शेरनाथबापू संचलित आश्रम बघण्यासारखे आहे. या आश्रमात अनेक वर्षांपासून अन्नदान सुरु आहे. गुरुशिष्य नाथ परंपरा येथे जपली जाते. लंबे हनुमानासमोर पायवाटेने आत चालत जंगलाच्या दिशेने संत श्री काश्मिरी बापूंचे आश्रम आहे.

दत्त गुरूंचे जागृत स्थान गिरनार पर्वतच्या पायऱ्या चढताना सुरुवातीलाच एक कमान लागते इथून भाविक पायऱ्या चढायला सुरुवात करतात. ज्यांना या पायऱ्या चढणे अशक्य वाटते ते कमानीजवळ डोलीवाले असतात. ते डोलीमधून देखील जाऊ शकतात. डोलीवाले ५ ते १० हजार रुपये माणशी घेतात. २०० पायऱ्या चढण केल्यावर डावीकडे श्री भैरवाच्या मूर्तीचे दर्शन होतात. २००० पायऱ्या चढण केल्यावर वेलनाथ बाबा समाधी स्थळ असे फलक दिसते. २२५० पायऱ्या नंतर राजा भर्तृहरी आणि गोपीचंद यांची गुहा आढळते. आत गेल्यावर दोन सुबक मुर्त्या दिसतात. पुढे गेल्यावर माली घाट येथे श्रीरामाचे मंदिर आहे.येथे थंड पाण्याचे कुंड आहे.

२६०० पायऱ्यांवर राणकदेवीआईची शीळ आहे. या शिळेवर दोन्ही हातांच्या पंज्याचे निशाण आहे. पुढे गेल्यावर ३५०० पायऱ्यांजवळ प्रसूतीबाई देवीचे स्थान आहे. येथे संतान प्राप्ती झाल्यावर आपल्या बाळांना घेऊन देवीआईच्या दर्शनास आणि आशीर्वाद घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने येतात. इथून पुढे गेल्यावर दत्त गुंफा, संतोषी माता, काली माता, वरूडी माता, खोडीयार माता अशी छोटी छोटी मंदिरे आहेत.इथे प्राचीन राजवाड्याचे जैन मंदिर आहे. हे जैन मंदिर २२ वे तीर्थंकर नेमिनाथांचे आहे. नेमिनाथांची काळ्या पाषाणाची अतिशय सुंदर आणि सुबक मूर्ती आहे. या ठिकाणी नेमिनाथ साधना करत असायचे. पुढे गेल्यावर जैनांचे पहिले तीर्थंकर आदिनाथांची भव्य प्रतिमा आढळते. येथे उत्तम कलाकुसर केलेल्या जैन मंदिरांचा समूह आहे. पुढे गेल्यावर गौ-मुखी गंगा म्हणून स्थान आहे. येथे गाईच्या मुखातून गंगेचे पाणी येते. बाजूला गंगेश्वर महादेव आणि बटुक भैरवाचे मंदिर आहे. गौमुखी वरून पुढे गेल्यावर उजव्या बाजूने चढण करताना ४८०० पायऱ्यांवर अंबाजी टुक येते हे शक्तीपीठ ५१ शक्तिपीठांपैकी एक आहे.या ठिकाणी देवी पार्वतीने अंबाच्या रूपात वास्तव्य केले होते. या मंदिरात अंबादेवीआईच्या सन्मुखाचे दार कायम बंद असते. हे दार होळी पौर्णिमा किंवा नवरात्रीलाच उघडले जाते. इथे असलेली अंबामातेची मूर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेते. देवी आईच्या शक्तीची प्रचिती इथे येतेच. मातेच्या दर्शन केल्यावर प्रवास सुखकरच होतो. पुढे गेल्यावर ५५०० पायऱ्या चढण केल्यावर श्री गौरक्षनाथ टुंक स्थान जे या गिरनार पर्वतावरील सर्वात उंच स्थान आहे येते. हे स्थान समुद्रसपाटीपासून सुमारे ३ ,६६६ फुटावर आहे.

असं म्हणतात की नेहमीच गुरूंचे स्थान उंचीवर असावे. या साठी गोरक्षनाथांनी दत्तगुरुंकडे प्रार्थना केली होती की "आपले चरणांचे दर्शन मला सतत व्हावे" दत्त महाराजांनी हे मान्य केले.म्हणून गौरक्षशिखर उंचीवर आहे. इथे नवनाथ संप्रदायच्या गुरु गोरक्षनाथांनी घोर तपश्चर्या केली त्यांना दत्तगुरूंनी साक्षात्कार दिला. आजतायगत येथे गोरक्षनाथांचा वावर असल्याचे समजले जाते. येथे बाजूलाच गोरक्षअखंड धुनी आहे.बाजूला पाप पुण्याची खिडकी आहे. या खिडकीतून निघाल्यावर मोक्ष मिळतो. असे समजले जाते. पुढे शिखरवर जाण्यासाठी १००० ते १५०० पायऱ्या उतरावे लागते. पुढे गिरनार बापूंची गुहा आहे. येथे भैरवनाथाचे मंदिर आहे. पुढे गेल्यावर दोन मोठ्या कमानी लागतात. उजव्या बाजूच्या कमानीतून ३०० पायऱ्या उतरून कमंडलू स्थान आहे. डाव्या बाजूच्या कमानीतून पुढे जाऊन १००० पायऱ्या चढून गुरुशिखर आहे. या गुरुशिखरावर चढताना काही वेगळाच अनुभव येतो. या ठिकाणी श्री दत्तात्रेयांनी तब्बल १२ हजार वर्षे तपश्चर्या केली होती. हे त्यांचे अक्षय निवास स्थान आहे. या १० X १२ चौ.फूट जागेत भगवान दत्तात्रेयांच्या पादुका ,एक सुबक मूर्ती आहे. बाजूला प्राचीन गणेश आणि हनुमानाची मूर्ती आहे. ही मूर्ती भाविकांचे लक्ष वेधून घेते. येथे एक प्राचीन शिवलिंग आहे.

येथे एक प्राचीन घंटा आहे अशी आख्यायिका आहे की या घंटावर ३ वेळा आपल्या पूर्वजांची नावे एक एक करून घेऊन वाजवल्यावर सर्व पितरांनां मुक्ती मिळते.

इथे ५ हजार वर्षांपासून असलेली दैव दुर्लभ देणगी अशी अखंड धुनी आहे. आजही ती धुनी प्रकट होते. या अग्निरूपानं साक्षात श्री दत्तप्रभूच प्रकटतात. दत्तमहाराज कोणत्या ना कोणत्या रूपात इथं येतात. आश्रमाच्या मागील बाजूने उतरले की महाकाली गुंफेच्या डोंगराकडे वाट जाते. ही वाट घनदाट जंगलातून आहे येथे पायऱ्या नसून खडकाळ दगडावरुन चालत जावे लागते. गुहेत मातेचा उग्र मुखवटा असलेली मूर्ती आहे. बाजूला असणाया दोन डोंगरावर रेणुका माता आणि अनुसूया मातेची मूर्ती आहे. गिरनारच्या बाजूस भव्य दातार पर्वत आहे. या पर्वतावर चढण करताना ३ हजार पायऱ्यावर दातार भगवानांचे वास्तव्य आहे. या पर्वतावर चढण करणे अवघड आहे. गिरनार पर्वताची परिक्रमा करण्यासाठी उजव्या हाताला ठेऊन प्रदक्षिणा घालतात. गिरनारच्या भोवती घनदाट जंगल आहे. या जंगलात फॉरेस्ट डिपार्टमेंटच्या आज्ञा शिवाय अनुमती मिळत नाही. फक्त परिक्रमेच्या कालावधीत येथे ५ दिवसांसाठी भाविकांना प्रवेश देण्यात येते. गिरनार पर्वताची परिक्रमा केल्यावर आपले सर्व पापांचा नाश होतो पापांपासून मुक्ती मिळते. अशी आख्यायिका आहे. भाविक येथे परिक्रमा करतात. गिरनार पर्वत हा एका चिर निद्रेत झोपलेल्या साधूंसारखा भासतो, आणि जे महाराजांचे गुरूशिखर आहे ते या झोपलेल्या साधू पुरुषाच्या कपाळावर मधोमध म्हणजेच आज्ञा चक्रावर आहे.थोडक्यात गिरनार ची पहिली पायरी जेथून सुरू होते ते मूलाधार आणि गुरुशिखर चढून मंदिरात प्रवेश झाला की आज्ञाचक्र पर्यंत असा प्रवास होतो, पहिल्या ७५०० पायऱ्या पर्यंत बहुतेक लोकांना त्रास होतो. इथे १०,००० पायऱ्या चढून जावे लागते. आणि प्रत्येक पायरीवर आपल्यातील दुर्गुणांना सोडून पुढच्या पायरीवर पाऊल टाकायचे असते. काम, क्रोध, मत्सर, अशा सर्व दुर्गुणांचा त्याग करून शेवटच्या पायरी पर्यत चढायचे असते. गुरुशिखरावर गेलो की एकदम विचारशून्य आणि नमन अवस्था अनुभवता येते, महाराजांना काही मागायचे लक्षातच राहत नाही. फक्त डोळे भरून दर्शन घेण्यातच धन्यता वाटते, अश्रू दाटून येतात. कंठ सद्गदित होतो, अष्टभाव दाटून येतो . फक्त महाराजांच्या चरण पादुका आणि दत्तगुरूंची हसरी मूर्ती दिसत राहते , इथला प्रभावच तशा आहे. ज्याची जशी साधना तसे त्याला अनुभव येतात. उच्च कोटीच्या साधकांना पादुकांवर साक्षात निलमणी सारखी कांती असणाऱ्या आणि चंपाकळी सारख्या कोमल आणि तेजस्वी असे गुरुदेव दत्त महाराजांचे दर्शन होते. मग 'दत्त दत्त ऐसें लागले ध्यान, हरपले मन झाले उन्मन , मी तू पणाची झाली बोळवण, एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान' हे अगदी अनुभवास येते. म्हणजेच मानवी जन्म सार्थकी लागतो. सहस्त्रार चक्रापर्यंत प्रवास पूर्ण होतो.महाराजांना एकच विनंती,' गुरु महाराज आम्ही कधी चुकलो, अडखळलो, वाम पंथाला लागलो तरी तू आम्हाला योग्य मार्गावर आणावेस अशी दत्तगुरु महाराजांच्या चरणी प्रार्थना.

**या ठिकाणी जाण्यासाठी -**

बस मार्गे -सुरत,बडोदा,अहमदाबाद या शहरातून जुनागड(गिरनार)साठी नियमीत बससेवा आहे.
रेल्वे मार्गे - सुरत,अहमदाबाद,राजकोट,जुनागड अशी रेल्वे सेवा आहे.
या ठिकाणी राहण्यासाठी अनेक धर्मशाळा आहेत.

# अनिल बोरनारे यांनी घेतला आरटीई प्रवेशाचा आढावा
## कल्याण डोंबिवली मनपा अधिकाऱ्यांसमवेत अनिल बोरनारे यांनी घेतली बैठक

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता**
**कल्याण(प्रतिनिधी) :**
कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील शाळांमधील आरटीई प्रवेशाचा आढावा भाजपा प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित सदस्य व शिक्षण विभागाच्या राज्य सल्लागार परिषदेचे सदस्य अनिल बोरनारे यांनी घेतला.

आज कल्याण डोंबविली मनपा शिक्षण मंडळाच्या कार्यालयात वरिष्ठ लेखा अधिकारी श्याम भोईर व समग्र शिक्षा अभियानाचे उपलेखापाल अजित सिंग यांच्यासमवेत बोरनारे यांनी बैठक घेतली.

यावेळी अनिल बोरनारे यांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत खाजगी शाळांमधील २५ टक्के प्रवेश हे आर्थिकदृष्टया मागास असलेल्या पालकांच्या पाल्यांना मिळावेत यासाठी अधिकाऱ्यांना अनेक सूचना केल्या. त्यामध्ये प्रवेश प्रक्रिया शासनाच्या नियमांनी होऊन पारदर्शकता आणावी, प्रवेश प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी व तक्रारीचे निराकरण तातडीने करण्यात यावे कल्याण



डोंबिवली मनपा क्षेत्रातील सर्व शाळांची नोंदणी मुदतीआधी पूर्ण करण्यात यावी यासह अनेक सूचना बोरनारे यांनी केल्या. कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रात आर टी ई प्रवेशासाठी ८० शाळा पात्र असून त्यामध्ये राज्य मंडळ, सीबीएससी तसेच आंतरराष्ट्रीय बोर्डाच्या शाळा असून या शाळांना शाळास्तरावरची नोंदणी ४ जानेवारी पर्यंत करायची असून ६२ शाळांची नोंदणी पूर्ण झाली असून उर्वरीत शाळांची नोंदणी पूर्ण करण्याच्या सूचना बोरनारे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बोरनारे यांनी घेतला आदर्श मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर कामाचा धडाका लावणारे देवेंद्र फडणवीस आपले आदर्श असून राईट टू एज्युकेशन ॲक्ट अंतर्गत राज्य सल्लागार परिषदेवर केलेली नियुक्ती सार्थ ठरवून एमएमआर क्षेत्रासह राज्यातील १ लाखाहून अधिक शाळांमध्ये 'राईट टू एज्युकेशन' कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणार असून या कायद्याअंतर्गत RTE प्रवेश, राज्यातील शिक्षकांच्या समस्या तसेच अन्य शैक्षणिक प्रश्न सोडविणार आहेत त्यासाठी राज्यभर प्रवास करून शाळांना भेटी देऊन कायद्याच्या अंमलबजावणी साठी शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक, संचालक शिक्षण आयुक्त शिक्षण सचिव यांच्यासोबत बैठक घेणार आहेत.यासोबतच आर्थिक दृष्टया कमकुवत २५ टक्के मुलांना सर्व केंद्रीय विद्यालये, नवोदय विद्यालये, सैनिक शाळा आणि खाजगी शाळांमध्ये प्रवेश मिळवून देणे, शिक्षकांच्या सेवाशर्तीचे प्रश्न सोडविणे ही कामे प्राधान्याने करणार आहे

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# भिवंडी उत्पादन शुल्क विभागाची उल्लेखनीय कारवाई

## वर्षा अखेरीस केलेल्या कारवाईत ३६ गुन्हे उघडकीस; लाखोंचा मुद्देमाल जप्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**भिवंडी :** शासनाच्या उत्पादन शुल्क भिवंडी विभागाने वर्षा अखेरीस केलेल्या कारवाईत ३६ गुन्हे उघडकीस आणले असून तीन लाख ७७,४०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. भिवंडी येथील उत्पादन शुल्क विभागात एकूण तीन बिट असून अधिकारी आणि कर्मचारी मिळून एकूण नऊ जण काम करीत आहेत. या विभागात भिवंडी शहरातील शांतीनगर, शहर पोलीस ठाणे तसेच कल्याण तालुका आणि खडकपाडा पोलीस ठाण्याचे क्षेत्र आहे. या कार्यक्षेत्रांतर्गत ढाबे, अवैध दारूची वाहतूक आणि बेकायदेशीर दारू विक्री यांच्यावर कारवाई करून ३१ गुन्हे दाखल करून तीन लाख ६५,२३५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून त्यामध्ये दोन दुचाकींचा समावेश आहे. तसेच ३१ डिसेंबरच्या कारवाईत ढाबा, दारूविक्री आणि उघड्यावर दारू पिणे अशा एकूण पाच गुन्ह्यांमध्ये पाच जणांविरोधात कारवाई करण्यात आली. या कारवाईत गुन्हे दाखल करून २० लिटर गावठी दारू, साडेसात लिटर विदेशी दारू आणि आठ लिटर देशी दारू असा एकूण १२,१७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई भिवंडी विभागाचे मुख्य पोलीस निरीक्षक सुभाष खंडेराय यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आली. या घटनेने अवैध दारू विक्री करणारे आणि उघड्यावर दारू पिणाऱ्या तळीरामांचे धाबे दणाणले आहेत.

# शहापूर माजी सरपंचावर प्राणघातक हल्ला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण ताजे असतानाच, जमिनीच्या वादातून शहापूर तालुक्यातील अजनुप ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच कदम उघडे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला.

याप्रकरणी तीन जणांना कसारा पोलिसांनी अटक केली असून इतरांचा शोध सुरू आहे. जमिनीबाबत जुना वाद असल्याने हा हल्ला झाल्याचे समजते. दरम्यान कुंजल सांडे (२८), शांताराम भगत (३६) आणि कैलास कामडी (२८) या तिघांना अटक केली आहे. असून उघडे यांना पुढील उपचारासाठी कल्याण शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

# सिडकोच्या धडक मोहिमेत दोन लाख चौ.मी. हून अधिक क्षेत्र अतिक्रमणमुक्त

दै.ठाणे जीवनदी वार्ता

**नवी मुंबईः** सिडको अधिकारक्षेत्रातील अनधिकृत बांधकामांविरुद्ध सन २०२४मध्ये धडक मोहिमा राबवून २,१०२ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली तर दोन लाख ६,४३१ चौ.मी. क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले.

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखालील या कारवाया करण्यात आल्या.

नवी मुंबईसारख्या सुनियोजित शहराच्या विकासामध्ये अडथळा ठरणारी व शहराला विद्रुपीकरण करणारी अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कार्यवाही सिडकोतर्फे नियमितपणे पार पाडण्यात येते.



सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने सन २०२४ या वर्षामध्ये ५४७ निष्कासन मोहिमांचे आयोजन करून ३०२ यशस्वी मोहीमांदरम्यान सिडको संपादित जमिनींवरील २,१०२ अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे निष्कासित केली. निष्कासित करण्यात आलेल्या बांधकामांमध्ये कच्ची बांधकामे, आरसीसी बांधकामे, टपऱ्या इ. समावेश होता. निष्कासन कारवाई करण्यापूर्वी २,१६० अनधिकृत बांधकाधारक/अतिक्रमणधारकांना एमआरटीपी अंतर्गत नोटीसा बजावून बांधकाम निष्कासित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

या मोहींमादरम्यान नवी मुंबई पोलीस आयुक्तालया अंतर्गत येणाऱ्या पोलीस स्थानकांतील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी वेळोवेळी योग्य तो पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून दिला.

नवी मुंबई क्षेत्रामध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटल सेतू (एमटीएचएल), उलवे सागरी मार्ग, नवी मुंबई मेट्रो, सिडकोचे गृहनिर्माण प्रकल्प विकसित करण्यात आले असून व इतर पायाभूत सुविधा प्रकल्प नियोजित किंवा प्रगतीपथावर आहेत. या पार्श्वभूमीवर, नवी मुंबईचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील लौकिक अधिक वृद्धींगत होत असताना अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामांमुळे शहराच्या विकासाला बाधा येऊ नये याकरिता अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामांविरुद्ध आयोजित करण्यात येणाऱ्या या मोहिमा महत्त्वाच्या ठरतात.

निष्कासन मोहिमांव्यतिरिक्त, नागरिकांना सावध करण्याकरिता सिडकोतर्फे अतिक्रमणधारक/अनधिकृत बांधकामधारकांना बजावण्यात आलेल्या नोटीसा वेळोवेळी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येतात. तसेच नागरिकांनी नवी मुंबई किंवा नैना क्षेत्रामध्ये सदनिका किंवा दुकाने खरेदी करताना संबंधित बांधकामाबाबतची कागदपत्रे तपासावीत व संभाव्य आर्थिक फसवणूक टाळावी, असे आवाहनही सिडकोतर्फे करण्यात येत आहे.

# "योग्यवेळी योग्य निर्णय घेणार",

## ठाकरे गटाचे नेते राजन साळवी यांचं मोठं विधान

**'गेल्या काही दिवसांपासून प्रसार माध्यमांच्या माध्यमातून माझ्या प्रवेशासंदर्भात वेगवेगळया चर्चा रंगल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मला कार्यकर्त्यांचा आग्रह होता की आपण यावं आणि संवाद साधावा. मी काल राजापूर या ठिकाणी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. तेव्हा सर्वांनी भावना व्यक्त केल्या की माझ्यावर अन्याय झाला आहे. माझ्या पराभवाला अनेक मंडळी कारणीभूत आहेत. तसेच तुम्ही योग्य तो निर्णय घ्या, अशा भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. त्यांना मी देखील सांगितलं की, मी योग्यवेळी योग्य निर्णय घेईन. तसेच आज लांजा येथील पदाधिकाऱ्यांनी मला बोलावलं होतं. मी या ठिकाणीही आलो कार्यकर्त्यांशी संवाद साधला. माझ्या भावना मी त्यांच्याबरोबर व्यक्त केल्या. यावेळी निश्चितच भविष्यात योग्यवेळी योग्य तो निर्णय घेईन असं मी त्यांना सांगितलं आहे', असं राजन साळवी यांनी स्पष्ट केलं.**



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

राजापूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राजन साळवी हे शिवसेना ठाकरे गट सोडणार असल्याच्या चर्चा गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात आहेत. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत राजन साळवी यांचा किरण सामंत यांनी पराभव केला. या पराभवानंतर राजन साळवी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षावर नाराज असल्याचं बोललं जात आहे. मात्र, पक्ष सोडणार असल्याच्या चर्चांवर राजन साळवी यांनी गुरुवारी (२ डिसेंबर) पत्रकार परिषद घेऊन या चर्चांना पूर्णविराम दिला होता.

'मी नाराज असल्याच्या चर्चा आहेत, मात्र, पण तसं काही नाही', असं स्पष्टीकरण राजन साळवी यांनी दिलं होतं. मात्र, आज राजन साळवी यांनी माध्यमांशी संवाद साधत पक्ष बदलाचे संकेत दिले आहेत. 'मी योग्यवेळी योग्य निर्णय घेईन', असं स्वतः राजन साळवी यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या विधानामुळे उलटसुलट चर्चा रंगल्या आहेत.

**'पराभवाला वरिष्ठ कारणीभूत'**

'माझ्या पराभवाला काही वरिष्ठ मंडळी कारणीभूत आहेत. मी आज त्यांचं नाव घेऊ इच्छित नाही. मात्र, कोण आहे हे शोधणं गरजेचं आहे. आज पक्षावर आणि माझ्यावरही दुःखाचा डोंगर आला. यासाठी कोण कारणीभूत आहे हे शोधणं गरजेचं आहे. जर शोधलं नाही तर आता माझ्यावर जी वेळ आली, तीच वेळ भविष्यात आणखी कोणावर येऊ शकते. मात्र, अशी वेळ येऊ नये, यासाठी योग्य तो निर्णय घेतला पाहिजे आणि मी योग्यवेळी योग्य निर्णय घ्यायला सक्षम आहे. माझ्या मतदारसंघातील अनेकांनी मला सांगितलं की तुम्ही योग्य निर्णय घ्या आम्ही तुमच्याबरोबर आहोत', असं राजन साळवी यांनी म्हटलं.

**राजन साळवींनी काल काय स्पष्टीकरण दिलं होतं?**


'ठाकरेंचा निष्ठावंत सैनिक म्हणून माझी ओळख आहे. २०२४ च्या पराभावाला आम्ही सामोरे गेलो आहोत. पराभवाचं दुःख, खंत आणि वेदना माझ्यासकट माझ्या मतदारसंघातील सामान्य जनतेला आहे. पराभवाची खंत असताना भविष्याकडेही शिवसेना मार्गक्रमण करतेय. तुमच्या माध्यमातून मला समजतंय की मी नाराज आहे. भाजपा किंवा शिंदे गटाच्या वाटेवर आहे. पण तसं काही नाही. माझ्या रोजच्या कामात माझं मार्गक्रमण सुरू आहे. अशातऱ्हेच्या बातम्या अफवा आहेत. हा निष्ठावंत सैनिक बाळासाहेबांचाच राहणार, यात कोणतीही शंका नाही', असं राजन साळवी म्हणाले.

# ठाणे मनपाचे सहायक आयुक्त भालचंद्र घुगे यांच्यावर हल्ला

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**ठाणे :** ठाण्यात काही वर्षा पासुन वाढत असलेली अनधिकृत बांधकामे व त्यातून पैसा व पैशातून सत्ता हि समीकरणे उदयाला येत असताना मनपा प्रामाणिक अधिकारी अनधिकृत बांधकामांवर मोठ्या धाडसाने कारवाई करण्यात गेले की विविध दबावाला सामोरे जावे लागत आहे.पर्यायी जीव घेणे हल्ले होत आहेत.२०१२ साली याच दिव्यात तत्कालीन धाडसी, कार्यतत्पर,सडेतोड, अधिकारी अशोक बुरुपुल्ले व त्यांच्या सहकाऱ्यांवर जीव घेणा हल्ला झाला होता, त्यांना बेदम मारहाण करण्यात आली असतानाही अशोक बुरुपुल्ले यांनी दिव्यातील अनधिकृत गोदामे जमीनदोस्त केली होती.पण त्यांची निवृत्ती नंतर पुन्हा हजारो अनधिकृत बांधकामे त्या ठिकाणी उभी राहिली आहे.पोलीस बंदोबस्त असताना अधिकाऱ्यावर जीव घेना हल्ला होतो ही हिम्मत अनधिकृत बांधकाम करणाऱ्या मध्ये येते कुठून हा संशोधनाचा विषय आहे.दिवा प्रभाग समिती सहायक आयुक्त भालचंद्र घुगे हे उच्च शिक्षित,धाडसी व प्रामाणिक अधिकारी असून त्यांच्या वरील हल्ला ने राजकीय व प्रशासकीय वर्तुळात नाराजी व्यक्त केली जात आहे.गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर कडक कारवाई करण्यात यावी. कल्याण फाटा या ठिकाणी चार ते पाच अनधिकृत गाळयांवर कारवाई करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून शुक्रवारी दुपारच्या सुमारास दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त भालचंद्र घुगे हे आपल्या टीम सोबत कल्याण फाटा या ठिकाणी कारवाई करण्यासाठी पोहोचले. यावेळी एका गाळेधारकाची आणि पालिका अधिकाऱ्यांमध्ये बाचाबाची झाली. असल्याची माहिती आहे.

# नव्या कळवा पुलावरील सुरक्षा साधनांची चोरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
○ प्रतिनिधी

**ठाणे :** कळवा आणि ठाणे शहराला जोडणाऱ्या तिसऱ्या खाडी पुलावरील अर्थात नव्या कळवा पुलावरील सुरक्षा साधने दोन वर्षांतच गायब झाली आहे. उड्डाणपुलाखालून खाडी वाहत असल्याने पुलावरील पदपथालगत ठाणे महापालिकेने सुशोभिकरण तसेच सुरक्षेच्या दृष्टिने काच सदृश्य साधने बसविली होती. त्यामुळे पदपथावर फेरफटका मारण्यासाठी आणि छायाचित्र काढण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता व्यक्त होत आहे. ही सुरक्षा साधने चोरीला गेली असून नव्याने सुरक्षा साधने बसविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती महापालिका सुत्रांनी दिली.

ठाणे शहरातून नवी मुंबई, मुंब्रा,कळवा, विटावा भागात वाहतुक करण्यासाठी कळवा खाडी पूल महत्त्वाचा आहे. या मार्गावरून हजारो हलकी वाहने वाहतुक करतात. जुना कळवा पूल हा वाहतुकीसाठी अरुंद होता. त्यामुळे ठाणे महापालिकेने हा तिसरा नवा खाडी पूल बांधला होता. त्यासाठी महापालिकेने १८३ कोटी रुपये खर्च केले. नोव्हेंबर २०२२ मध्ये या पुलाचे लोकार्पण झाले होते. उड्डाणपुलामुळे कळवा, कोर्टनाका आणि साकेत भागात होणारी वाहतुक कोंडीतून दिलासा मिळाला. पुल उभारताना ठाणे महापालिकेने त्याचे सुशोभिकरण केले होते. तसेच उड्डाणपुलालगत एक पदपथ बनविण्यात आले होते. उड्डाणपुलाखालून ठाणे खाडी वाहते.

> **ठाणे महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून हा उड्डाणपुल उभारला. येथे उड्डाणपुलाची आवश्यकता होती. या पुलामुळे कोंडीची समस्या देखील कमी झाली आहे. परंतु सुशोभिकरणासाठी वापरलेली साधने गायब झाली आहे. त्यामुळे येथे सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिक फेरफटका मारण्यासाठी येत असतात. सुरक्षा साधनांअभावी एखादी दुर्घटना होऊ शकते.**
>
> **- नूतन जांभेकर, रहिवासी, कळवा.**

त्यामुळे महालिकेने सुरक्षेच्या दृष्टिने या पदपथालगत काच सदृश्य साधने बसवून सुरक्षा कुंपण तयार केले होते. तसेच उड्डाणपुलावर विद्युत रोषणाई देखील केली होती.

परंतु उड्डाणपुलावर सुरक्षा रक्षक नसल्याने येथील सुरक्षा साधने आणि विद्युत रोषणाई गायब झाली आहे. पदपथावरून अनेकजण सकाळी किंवा रात्रीच्या वेळेत फेरफटका मारण्यासाठी, छायाचित्र काढण्यासाठी येत असतात. त्यामुळे एखादी दुर्घटना होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. सकाळी वाहतुक कोंडी झाल्यास दुचाकी चालक देखील या पदपथाचा वापर पदपथावर वाहने नेत कोंडी टाळतात. परंतु सुरक्षा साधने गायब झाल्याने एखादे वाहन खाडीत पडल्यास ते जीवावर बेतण्याची शक्यता आहे.



# स्थानिक रेल्वे प्रवाशांच्या समस्यांबाबत खासदार बाळ्यामामा आक्रमक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**बदलापुर :** लोकसभा निवडणुकीत जायंट किलर ठरलेले महाविकास आघाडी राष्ट्रवादी चे खासदार बाळ्या मामा म्हात्रे आता ॲक्शन मोडवर आले आहेत. प्रलंबित रेल्वे प्रवासी समस्या आणि स्थानकावर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खा.म्हात्रे यांनी सुरुवात केली आहे. रेल्वे संबधीत काम पाहणारे स्विय सचिव प्रथमेश सिंग यांच्या मार्फत त्यांनी रविवार ३० डिसेंबर रोजी वांगणी रेल्वे स्थानक व तेथील रेल्वे प्रवासी समस्या यांचा परिपूर्ण आढावा घेतला.

यावेळी त्यांचे सोबत रेल्वे प्रवासी संस्था अध्यक्ष व मध्य रेल्वेच्या उपनगरीय उपभोक्ता सल्लागार समितीचे सदस्य मनोहर शेलार,वांगणी स्थानक प्रबंधक गजेंद्र रॉय तसेच भूषण देशमुख व सईद गाझि हे कार्यकर्ते उपस्थित होते. कल्याण कर्जत लोकल फेऱ्या वाढवाव्यात,यार्डातील लोकल वांगणी मुंबई चालवण्या साठी टर्मिनल सुविधांची तांत्रिक कामे व्हावीत या महत्वाच्या मागण्यांसह ,लिफ्ट व सरकत्या जिन्याचे अर्धवट काम,अपूर्ण शेड,पूर्व व पश्चिमेस नव्या तिकीट खिडक्या,मध्यभागी नवीन पादचारी पूल,फलाटावरचि अपूर्ण आसनव्यवस्था,प्लॅटफॉर्म

वर नवीन लिफ्ट व पूर्वेला सरकता जिना इत्यादि महत्त्वाच्या मागण्या मनोहर शेलार यांनी केल्या. तसेच २०२० साली वांगणी स्थानकाजवळ मंजूर झालेला रेल्वे उड्डाणपूल पूर्ण करण्याला खासदार बाळ्या मामा यांनी सर्वोच्च प्राधान्य द्यावे अशी खास आग्रही मागणी यावेळी शेलार यांनी केली. खा.बाळ्या मामा यांना वांगणी प्रवासी संघटनेने वरील सर्व मागण्यांचे विस्तृत निवेदन सादर केले आहे.

नव्या वर्षांत मध्य रेल्वेच्या महाप्रबंधक व विभागीय व्यवस्थापक यांचे सोबत विशेष बैठक घेऊन या समस्या मार्गी लावल्या जातील असे स्पष्ट आश्वासन यावेळी खासदारांच्या वतीने स्विय सहायक प्रथमेश सिंग यांनी वांगणीकर जनतेला दिले आहे.

# केडीएमसीमधील 'त्या' बेकायदा इमारतींना मुंबई हायकोर्टाकडून दिलासा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीत अनेक घर ग्राहकांनी इमारत अधिकृत असल्याविषयी खुद्द 'रेरा' नोंदणीची खातरजमा करूनच घरे खरेदी केलेली असतानाही, खासगी बिल्डरांनी त्या नोंदणीसाठीच बनावट कागदपत्रांचा आधार घेतलेला असल्याने इमारतीच बेकायदा ठरल्या. अशा ५८ इमारतींमधील काही हजार कुटुंबांवर बेघर होण्याची वेळ आली होती. मात्र, मुंबई हायकोर्टाने शुक्रवारी दिलेल्या अंतरिम आदेशाने या रहिवाशांना आशेचा मोठा किरण दिसला आहे. बांधकाम नियमितीकरणासाठी कायदेशीर प्रक्रिया करण्याकरिता त्यांना थोडा अवधी मिळाला आहे. तसेच ३ फेब्रुवारीपर्यंत त्यांच्या इमारतींना पाडकाम व निष्कासनाच्या कारवाईपासून हंगामी संरक्षण मिळाले आहे.

महापालिकेच्या निष्कासन नोटिसांविरोधात यापूर्वी कोर्टात अर्ज केलेल्या चार सोसायट्यांना



## नियमितीकरणासाठी प्रयत्न करता येणार

मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय व न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने हंगामी दिलासा देत, ३ फेब्रुवारीपर्यंत संरक्षण दिले होते. बांधकाम नियमितीकरणाचे प्रलंबित अर्ज आणि त्यावरील निर्णय प्रलंबित असल्याचे कारण त्यांनी दिले होते. तशाचप्रकारे आणखी १२ सोसायट्यांनी शुक्रवारी अर्ज दाखल करत तोच हंगामी दिलासा देण्याची विनंती केली. याविषयीच्या सुनावणीनंतर खंडपीठाने हा अंतरिम आदेश दिला. त्यामुळे ३ फेब्रुवारीपर्यंत महापालिकेला कारवाई करता येणार नाही, हे स्पष्ट झाले आहे. कोणत्या इमारतींचे बांधकाम नियमित होऊ शकते आणि कोणत्या नाही, हे ३ फेब्रुवारी रोजी महापालिकेच्या प्रतिज्ञापत्रातून स्पष्ट होण्याची शक्यता आहे. त्यानंतरच या सर्व इमारतींचे भवितव्य स्पष्ट होईल.

या इमारतींमधील बहुतांश घरग्राहक हे 'रेरा नोंदणी'च्या विचित्र घोटाळयाचे बळी ठरल्याने हतबल झाले आहेत. 'महाराष्ट्र टाइम्स'ने त्यांच्या व्यथांकडे लक्ष वेधले होते. नागपूर विधिमंडळ अधिवेशनातही त्यांचा प्रश्न उपस्थित झाला होता.

महापालिकेने एमआरटीपी कायद्यातील तरतुदीप्रमाणे आम्हाला नोटीस दिली नसून थेट निष्कासनची नोटीस दिली आहे. शिवाय केवळ हायकोर्टाचा आदेश पुढे करून कारवाईची पावले उचलत आहे. त्यामुळे आमची अडचण झाली आहे, असाही युक्तिवाद झाला.

# गडकरी रंगायतनची घंटा मार्चनंतर वाजणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता ○ प्रतिनिधी

ठाणेः ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतनची तिसरी घंटा तीन महिन्यानंतर वाजणार आहे. गडकरी नाट्यगृहाच्या नूतनीकरणाच्या कामानंतर आता दुरुस्तीच्या कामामुळे पालिकेचे बजेट वाढले आहे. दरम्यान, नाट्यगृहाची डेडलाईन हुकली असल्याने कलाकार, रसिक,नाट्यप्रेमींना अजून काही महिन्यांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

ठाण्याच्या मासुंदा तलाव परिसरात असलेल्या महापालिकेच्या राम गणेश गडकरी रंगायतन या नाट्यगृहाच्या नुतनीकरणाचे काम ऑक्टोबर २०२४ मध्ये सुरू करण्यात आले आहे. ९० दिवसांच्या अवधीत हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. मात्र, नाट्यगृहाच्या अंतर्गत दुरुस्तीचे काम हाती घेतल्याने जवळपास २ ते ३ महिन्याचा कालावधी लागणार असल्याची शक्यता पालिकेच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. गडकरी रंगायतनमधील सुधारणा करताना रंगायतनचे पारंपरिकपण जपले जाणार आहे. तसेच, काळानुरुप अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. कलाकार आणि रसिक या दोघांनाही सुखद अनुभव मिळेल, हा उद्देश नजरेसमोर ठेवून रंगायतनचे नूतनीकरण केले जात आहे. रंगायतनच्या नूतनीकरणासाठी राज्य सरकारने आठ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून महापालिकेच्या तिजोरीतून देखील खर्च करण्यात येणार आहे.


नुतनीकरणात प्रामुख्याने प्रवेशद्वाराची आधुनिक रचना, मुख्य वास्तूचे मजबुतीकरण, तालीम हॉलचे नुतनीकरण, मुख्य प्रेक्षागृहातील संपूर्ण आसनव्यवस्था बदलणे, रंगकर्मी यांच्यासाठी असलेल्या ग्रीन रूममध्ये आवश्यक सुधारणा, रंगमंच-फ्लोरिंग अद्ययावत करणे, वातानुकूलन यंत्रणेत सुधारणा, शौचालयांचे संपूर्ण अद्यावतीकरण, ड्रेसिंग तसेच व्हीआयपी रूम, अद्यावत सीसीटिव्ही कॅमेरे आदी कामांचा समावेश आहे. लाईट, कॅमेरा,ॲक्शन यासाठी काही नाट्यकर्मींशी चर्चा करून या कामांची रुपरेषा ठरवण्यात आली आहे.

नाट्यगृहाच्या संपुर्ण दुरुस्तीसाठी तब्बल २६ कोटी ९० लाखांचा खर्च करण्यात येणार आहे. त्यापैकी राज्य सरकारकडून आतापर्यंत अवघा आठ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून उर्वरित निधी दुसऱ्या टप्प्यात येणार आहे.



# आडीवली परिसरात विविध कामांसाठी निधी देण्याची खासदारांकडे मागणी

## आई एकविरा महिला मंडळाचे खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांना निवेदन



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

आई एकविरा महिला मंडळाच्या संस्थापक अध्यक्ष सोनी क्षीरसागर तसेच समाजसेवक संदीप क्षीरसागर समाजसेवक यांनी आडीवली परिसरातील रस्ते सिमेंट काँक्रीटचे बनविणे आणि गटारे बांधणे, बॉक्सनाला यासाठी विकास निधी मिळण्यासाठी प्रत्यक्षात जाऊन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट घेत निवेदन दिले. तसेच त्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

आडीवली येथील रस्त्याची अवस्था खुप बिकट असून महिला, शाळकरी मुले व नागरिक यांना घाणीच्या रस्त्यावरून रोज नाहक त्रास सहन करावा लागत आहे. आई एकविरा महिला मंडळाच्या वतीने व नागरिकांच्या वतीने सिमेंट- कॉंक्रिट रस्ता व गटार याकरीता निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.आडीवली परीसरातील गणेश चौक राजाराम पाटील नगर ते तीन बंगला, निलम स्कुल, प्रदीप नगर चौक ते अनंत पाटील चौक, अंजना बाई भाने गार्डन पर्यंत, ऑस्टिन नगर चाळ ते श्री मलंग गड रोड पर्यंत रस्ते गटार तसेच शनिवार पार्क येथे बॉक्सनाला बांधण्याची मागणी खासदारांकडे करण्यात आली आहे.

### क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त

# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समिती सभागृहात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जिल्हाधिकारी श्री. शिनगारे यांनी अभिवादन केले. यावेळी पुराभिलेख संचालनाल याचे अभिलेखाधिकारी मनोज हिं. राजपूत, मीरा-भाईंदरच्या नायब तहसीलदार स्मिता गुरव, मुरबाडच्या नायब तहसीलदार सुषमा बांगर, पुराभिलेख संचालनालयाचे संशोधन सहाय्यक स्वप्निल गावडे, भरत गवळी यांच्यासह अधिकारी आणि कर्मचारी तसेच महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.



# 'जात्यांत' कादंबरीचे प्रकाशन



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

'जात्यांत' या सामाजिक कादंबरीचा प्रकाशन सोहळा नुकताच संपन्न झाला. अभिनेता ते लेखक असा प्रवास करणारे भरत काळे यांचे पहिले पुस्तक 'मैं जिंदगी का साथ निभाता चला गया.' या आत्मकथनानंतर दुसरे पुस्तक 'जात्यांत' या कादंबरीचे प्रकाशन झाले. गणेश मंदिर ट्रस्टच्या विनायक सभागृहात 'जात्यांत' कादंबरीचा प्रकाशन सोहळा पार पडला. 'जात्यांत' या कादंबरीच्या प्रकाशनापूर्वी संविधान पुस्तिकेचे पूजन करण्यात आले. भरत काळे यांचे नातू विवान काळे यांच्या संविधान उद्देशिकेच्या गायनाने पुस्तक प्रकाशन सोहळयास सुरुवात झाली.

प्राचार्य रमेश जाधव, चित्रकार विजयराज बोधनकर, लेखक सुरेश देशपांडे, रामभाऊ बाल विकास मंदिरच्या संचालिका सुलभा कांबळे , सरला खरात, प्रतिभा प्रकाशनाचे धर्मराज पाटील यांच्या उपस्थितीत 'जात्यांत' या कादंबरीचे दिमाखदार सोहळ्यात पुस्तक प्रकाशन करण्यात आले. विचारमंचावरील मान्यवर विचारवंतांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की,' 'जात्यांत' ही सामाजिक, कौटुंबिक कादंबरी आहे. लेखक भरत काळे यांनी अनुभवलेल्या जीवनाचे त्रयस्थपणे कथन केले आहे. 'जात्यांत' ही कादंबरी एका विशिष्ट जातीचे चित्र नाही तर समाजातील प्रत्येक व्यक्तीसाठी ती उद्बोधक आहे. 'जात्यांत' हे जिवंत वास्तवतेचे कल्पनाचित्र आहे. कादंबरीतील पात्र आपल्या अवतीभोवती आहेत असेच वाटत राहते. त्यामुळे 'जात्यांत' ही कादंबरी कायम वाचकांच्या मनात रुंजी घालत राहते.

या पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे प्रायोजक डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक संवर्धन संस्था, डोंबिवलीचे अध्यक्ष सुरेंद्र ठोके व निलेश कांबळे, विजय इंगोले आणि उपस्थित सदस्य यांनी विशेष सहकार्य केले. जात्यात कादंबरीच्या निमंत्रक लता काळे यांनी मान्यवरांचे परिचय व स्वागत करून लेखक भरत काळे यांना पुस्तक प्रकाशासाठी शुभेच्छा दिल्या.

तसेच मान्यवर सुभाष ठिपसे, रवींद्र हरोलीकर, अजित तामगावकर, शांताराम पवार, अंधश्रद्धा निर्मूलन संस्थेचे कार्यकर्ते गणेश चिंचोले यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. सुधीर चित्ते यांनी आपल्या खुमासदार शैलीत सूत्रसंचालन करून 'जात्यांत' कादंबरीच्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात महत्त्वाची कामगिरी बजावली.


# अग्निशमन दलाच्या जवानांची उल्लेखनीय कामगिरी

## कल्याण पूर्वेत तिसऱ्या मजल्याची ग्रील तुटल्याने दुसऱ्या मजल्यावरील सज्जावर उभ्या ठाकलेल्या ७वर्षीय चिमुकल्याला अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप खाली उतरवले

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) :**

कल्याण पूर्वेतील एका इमारतीच्या दुसऱ्या माळयाच्या सज्जावर तिसऱ्या माळयाच्या ग्रील मधून सज्जावर ग्रील तुटल्याने येऊन उभा ठाकलेल्या सात वर्षीय चिमुकल्याचे दैवत बल्वत्तर म्हणून जीवावर बेतलेले संकट अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी पोहचत शिडी लावून वर चढून जात त्या चिमुकल्यास जवानांनी त्यांची सुखरूप सुटका केली. तर अग्निशमन दलाचे जवान येई पर्यंत तुटलेली ग्रील शेजार्यांनी पकडून ठेवल्याने तसेच दुसऱ्या माळयाच्या सज्जावर तुटलेल्या ग्रीलचा अधार घेत तो चिमुकला उभा होता. निश्चितच दैव बलवत्तर म्हणून मोठा अनर्थ टळला.

कल्याण पूर्वेतील साईनगर परिसरातील चंद्रकिरण बिल्डिंग तळ मजला१३मजले असलेल्या इमारती तील तिसऱ्या मजल्यावरील सदनिकेतील ग्रील मध्ये खेळत असलेल्या चिमकुला ग्रील तुटल्याने दुसऱ्या मजल्यावरील सज्जा वर आला.त्याच समयास शेजार्यांनी समयसूचकता दाखवित तुटलेल्या ग्रीलला चिमकुलीची सुखरूप सुटका होत नाही तो पर्यंत पकडून ठेवले अशी माहिती सूत्राकडून प्राप्त झाली.



चिमुकल्यास अग्निशमन दलाच्या जवानांनी शिडीच्या सह्याने वर चढत जाऊन सुखरूपपणे खाली उतवरल्याचे पाहून उपस्थितांचा जीव भाड्यांत पडला. अवघ्या ७ वर्षीय चिमकुलीचे दैवबलवत्तर आणि लहानग्या वंश लाडंगे यांचे देखील कौतुक की एवढ्या उंचीवर अग्निशमन दलाचे जवान येई पर्यंत सज्जावर खंबीरपणे उभा राहिला.

या चिमकुल्यास रेस्क्यू केले ती टीम चे उपअग्निशमन आधिकारी संजय मस्के , अग्निशमन जवान अलेन डिसूजा, यश जगताप, निखिल सूर्यवंशी, यश जगताप , सुरज माळी, अपूर्व धुमाळ ,निलेश शेलार यांचा या रेस्क्यू मध्ये सहभाग होता.

# डोंबिवलीत स्वामी विवेकानंद जयंती उत्सव

## दहा दहा अकरा बारा जानेवारी रोजी व्याख्यान आणि पुरस्कार प्रदान

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता डोंबिवली(शरद शहाणे)**

राष्ट्रीय शिक्षण संस्थेच्या स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला व पुरस्कार प्रदानाच्या कार्यक्रमचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. शुक्रवार दि.१० जानेवारी २०२५ ते रविवार दि.१२ जानेवारी २०२५ या तीन दिवसात हा उत्सव संपन्न होणार आहे. या व्याख्यानमालेचा शुभारंभ शुक्रवार दि.१०जानेवारी २०२५ रोजी सन्माननीय प्राचार्य डॉ.श्री. विवेक वसंतराव काटदरे अध्यक्ष, विद्याभारती देवगिरी प्रांत यांचे 'शिक्षण धोरण- काल, आज आणि उद्या' या विषय़ावर व्याख्यान होणार आहे. शनिवार दि. ११



जानेवारी २०२५ रोजी सन्माननीय प्राचार्य डॉ.श्री. दिलीप गुणवंतराव जोशी अध्यक्ष, विद्याभारती विदर्भ प्रांत यांचे 'शिक्षणातील विमर्श' या विषयावर व्याख्यान होणार आहे तर रविवार दि.१२ जानेवारी, २०२५ रोजी स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वामी विवेकानंद पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला असून सन्माननीय श्री.दिलीप वसंत बेतकेकर, माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष विद्याभारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

याचबरोबर शुक्रवार दिनांक १० जानेवारी २०२५ रोजी आमदार मा. श्री. रविंद्र दत्तात्रय चव्हाण व नवनिर्वाचित आमदार मा.श्री. राजेश गोवर्धन मोरे यांचा सत्कार समारंभ सायंकाळी ६.०० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे. व्याख्यानमाला संस्थेच्या स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, छत्रपती भवन, आयरे रोड, दत्तनगर, डोंबिवली पूर्व या ठिकाणी पहिल्या दिवशी सायंकाळी ६..०० वाजता, दुसऱ्या दिवशी सायंकाळी ६.३० वाजता तर पुरस्कार प्रदान समारंभ सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे.

# बलिदान भूमी सिद्धगड येथे हूतात्म्यांना मानवंदना



शेकडो शालेय विद्यार्थी, देशभक्त नागरिक, शासकीय अधिकारी उपस्थितीत मानवंदना



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(दिलीप पवार)**

१९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यात ठाणे जिल्ह्यातील सिद्धगड येथिल जंगलात भुमिगत राहून ब्रिटिश सरकारला सळो की पळो करुन सोडणारे विठ्ठल (भाई) लक्ष्मण कोतवाल आणि त्यांच्या साथीदारांना तत्कालीन ब्रिटिश अधिकारी हाल यांनी मुरबाड तालुक्यातील सिद्धगडाच्या घळीत २ जानेवारी १९४३ ला पहाटे बेसावधपणे हल्ला केला.या हल्ल्यात क्रांतिवीर भाई कोतवाल व हिराजी पाटिल यांना विरमरण आले.या बलिदान भूमित २ जानेवारीच्या पहाटे अनेक वर्ष त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी हजारो देशभक्त येत असतात. आज सकाळी ६.१० मिनिटांनी स्मृतीस्थळी भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे ,आमदार किसन कथोरे, मा. आमदार गोटिराम पवार, प्रमोद हिंदूराव यांच्या हस्ते क्रांतीज्योत पेटवून शहिदांना अभिवादन केले.तर मुरबाड पोलीसांच्या वतिनेही मानवंदना देण्यात आली. यावेळी शेकडो शाळेय विद्यार्थी,देशभक्त नागरिक, शासकीय अधिकारी उपस्थित होते. १जानेवारीच्या रात्री सिद्धगड स्मारक समितिच्या वतीने वक्तृत्व, गायन, नाटक अशा विविध स्पर्धाचे आयोजन केले होते. यातील प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थांना मान्यवरांच्या बक्षिस देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिक्षक योगेंद्र बांगर यांच्या सिद्धगडाच्या १२ लढाया या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तर माजी आमदार गोटिराम पवार यांनी सिद्धगडाकडे जाणारा रस्ता गेली अनेक वर्ष होऊ शकला नसल्याने खंत व्यक्त केली असता खासदार सुरेश म्हात्रे व स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी रस्त्याचे टेंडर निघाले असुन वन खात्याच्या परवानग्या मिळताच रस्ता लवकरच मार्गी लागेल असे आश्वासन दिले. यावेळी उपविभागीय अधिकारी श्री गुजर, पोलीस अधिकारी जगदिश शिंदे ,तहसिलदार अभिजित देशमुख,गटविकास अधिकारी गायकवाड मॅडम यांच्यासह मोठ्या संख्येने देशभक्त नागरिक व शाळेय विद्यार्थी उपस्थित होते.

# भीमा कोरेगाव युद्धातील शूर वीरांना मानवंदना



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता बोरघर(विश्वास गायकवाड )**

दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौध्दमहासभा तालुका शाखा तळा व बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा तळा व उपशाखा यांच्या संयुक्त विद्यमाने भिमा कोरेगांव विजय दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या माध्यमातून तिन्ही संघटनेच्या माध्यमातून भीमा कोरेगाव ऐतिहासिक युद्धातील शूर पराक्रमी वीरांना मानवंदना देण्यात आली.

भीमा कोरेगांवचा इतिहास हा आपल्या शूरवीर पूर्वजांनी केलेल्या रणसंग्रामाचा आहे, हा रणसंग्राम हा अस्तित्वाच्या लढाईचा होता आणि त्यामध्ये आपल्या या शूरवीरांनी रात्रंदिवस पेशवाई विरुद्ध लढाई करून १ जानेवारी १८१८ साली या रणसंग्रामात विजय प्राप्त केला. या विजयाला १ जानेवारी २०२५ रोजी २०७ वर्ष पूर्ण झाली, या विजय दिवसाची स्मृती म्हणून दोन्ही संस्थेने एकत्र येऊन हा विजय दिवस विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक तालुका तळा या ठिकाणी विजयस्तंभाची प्रतिकृती उभारून समता सैनिक दलाचे जवान तालुका संरक्षण उपाध्यक्ष आयु.मनोहर शिंदे यांच्या परेडच्या माध्यमातून व भिम अनुयायांच्या माध्यमातून मानवंदना देण्यात आली, मानव आदर्शांच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिसरण पंचशील तळा तालुका संस्कार उपाध्यक्ष आयु.नरेश मोरे गुरूजी यांनी सुत्रपठण केले. विजय दिवसाच्या निमित्ताने आयु. संदेश पवार यांनी आपले शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले , त्याचप्रमाणे तळा तालूका महिला हिशोब तपासणीस आयुनि. महिमाताई जसवलकर, तळा तालुका महिला अध्यक्षा आयुनि.सुषमाताई शिंदे, तळा तालुका माजी महिला अध्यक्षा आयुनि.रेशमाताई गायकवाड, तळा तालुका बौद्धजन पंचायत समिती अध्यक्ष आयु.अनंत मोरे, तळा तालुका भारतीय बौद्धमहासभा अध्यक्ष आयु. रामदास राघो शिंदे आदी मान्यवर पदाधिकारी यांनी आपले विजय दिवसानिमित्ताने शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले, या कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचलन आयु.सुरेंद्र शेलार यांनी केले, या कार्यक्रमासाठी दोन्ही संस्थेचे मान्यवर पुरुष पदाधिकारी,महिला पदाधिकारी तसेच धम्मप्रिय उपासक उपासिका उपस्थित होते, त्याचप्रमाणे तळा तालुका भारतीय बौद्धमहासभा माजी कोषाध्यक्ष आयु.सुरेश साळवे, जेष्ठ मार्गदर्शक चिंतामण नाक्ते यांची उपस्थिती होती, या कार्यक्रमासाठी वाशी गावचे रहिवासी आणि दानदाते आयु. संदेश शिर्के,आयु.विठ्ठल जगताप यांनी अल्पोपहाराची व्यवस्था केली होती, सरणत्तत घेऊन या कार्यक्रमाची सांगता झाली.

# ५२ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उत्साहात उद्घाटन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता ठाणे(प्रतिनिधी) :**

इंटरनेटच्या युगात सगळे जग जवळ आले आहे. काय करावे आणि काय करू नये हे सांगायला पालकांना सुद्धा वेळ नाही. दोन्ही पालक नोकरी करतात त्यामुळे विद्यार्थी कम्प्युटर व मोबाईलमध्ये अडकलेला असतो. त्याला आधुनिक संगणकाचे युगात आपले संस्कार द्यावे लागेल. आणि त्यासाठी संवाद साधने गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचे डोक्यात अफलातून कल्पना असतात. आपल्याला वाटते आम्हीच हुशार आहोत परंतु विद्यार्थ्यांना त्याच्या पलीकडे ज्ञान आहे. अनेक समस्यांवर आम्ही विधिमंडळात उपाय काय करावे यावर चर्चा करत असतो परंतु विद्यार्थ्यांकडे अशा समस्यांवर अनेक संकल्पना असतात हे किती अभिनव आहे. अशा कल्पनांना वाव मिळणे गरजेचे आहे. आणि ते विज्ञान प्रदर्शनातून साध्य होत आहे. आपणास कल्पक बुद्धिमत्तेचे सीईओ लाभलेले आहेत. ते अनेक योजना राबवत आहेत. कोकण स्पर्धेमध्ये अग्रेसर आहे. खऱ्या शाळा ठाणे आणि कोकणामध्ये चालवले जातात. मिशन म्हणून शाळा चालवणाऱ्यांच्या आम्ही काय पाठीशी आहोत असे आमदार संजय केळकर यांनी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना सांगितले. शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद ठाणे यांच्या वतीने ५२ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक ०२ जानेवारी



२०२५ ते ०३ जानेवारी २०२५ या कालावधीत न्यू इंग्लिश स्कूल, कळवा, जि. ठाणे येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार संजय केळकर, ठाणे जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) ललिता दहितुले, प्राथमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे, न्यू इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष व्ही एन.हेगडे, कार्यकारी अध्यक्ष के. एच देशपांडे यांचे हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी मार्गदर्शन करताना आपले विद्यार्थी दशेतील अनुभव त्यांनी व्यक्त केले. विज्ञान प्रदर्शनाचे विषय आपले व्यवहारातील आहेत. रोजच्या जीवनातील समस्या कशा सोडता येतील याचा प्रयत्न यातून केला जात आहे. ई ऑफिसचे माध्यमातून अधिक वेगाने काम होत आहे. AI चे माध्यमातून शिक्षण पद्धतीत अनेक बदल घडवून आणले जात आहेत असे सांगून वेगवेगळया पद्धतीने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) ललिता दहितुले यांनी केले. प्रास्तविकाचे माध्यमातून विज्ञान प्रदर्शनाचे रूपरेषा सांगून विद्यार्थ्यांना दोन दिवसा करता शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी उपशिक्षणाधिकारी भाऊसाहेब मोहिते, सोनटक्के मॅडम, विस्तार अधिकारी मधुकर घोरड, विज्ञान परिवेक्षक छाया पराडके, न्यू इंग्लिश स्कूलचे उपाध्यक्ष एस. पी. कुलकर्णी, सचिव व्यासमूर्ती मुगळी, इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शीजा वर्गीस, व परिसरातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाश्वत भविष्यासाठी विज्ञान व तंत्रज्ञान या विषयावर आधारीत अन्न, आरोग्य आणि स्वच्छता, वाहतुक आणि दळणवळन,नैसर्गिक शेती,

आपत्ती व्यवस्थापन, गणितीय मॉडेलिंग आणि संगणकीय विचार, कचरा व्यवस्थापन विषयावर इ. ६वी ते १२वी मधील विद्यार्थ्यांनी प्रकल्प सादर केले आहेत. शिक्षक, प्रयोगशाळा परिचर यांनी प्रकल्प सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शिक्षक सुरेश पाटील सर यांनी केले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी